**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचं संकल्पपत्र अमित शाह यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध
- महाराष्ट्र विकास आघाडीचा महाराष्ट्रनामा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत जाहीर
- झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी प्रचार शिगेला
- यंदाच्या खरीप हंगामात शुक्रवारपर्यंतच्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारनं केली १२० लाख मेट्रीक टन भाताची खरेदी
- ज्येष्ठ सारंगीवादक पंडित रामनारायण यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार

**आणि**

- जागतिक बिलियर्डस स्पर्धेत भारताच्या पंकज अडवाणीला विजेतेपद तर सौरभ कोठारीला कांस्यपदक

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीचा निवडणूक जाहीरनामा शेतकऱ्यांचा सन्मान, आणि गरीबांची सेवा करणारा, युवकांना रोजगाराच्या नव्या संधी देणारा आणि महिलांचं सक्षमीकरण करणारा असा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत भाजपाचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर बोलत होते.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम दीड हजार रुपयांवरून एकवीसशे रुपये करणार, महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलिस दलात

समावेश केला जाणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी, २५ लाख रोजगारांची निर्मिती, अशी अनेक आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत.

महाविकास आघाडीची अनेक आश्वासनं ही केवळ लोकानुनयासाठी असून ती प्रत्यक्षात उतरणारी नसल्याची टीकाही शाह यांनी केली. खोटं फार काळ टिकत नसल्यामुळेच २०२२ साली महाविकास आघाडीचं सरकार कोसळल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

उपमुख्यमं्त्री देवेंद्र फडणवीस, खासदार पियुष गोयल तसंच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज मुंबईत महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा प्रकाशित केला. मुंबईत जाहीर केलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित हा सविस्तर जाहीरनामा प्रकाशित करत असल्याचं मल्लिकार्जुन खर्गे यावेळी म्हणाले. या महाराष्ट्रनाम्यात शेती आणि ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, पर्यावरणावर आधारित शहर विकास या मुद्द्यांवर आश्वासनं देण्यात आली आहेत. पंचसूत्री कार्यक्रमात प्रत्येक कुटुंबाला वर्षाकाठी ३ लाख रुपयांची मदत, महालक्ष्मी योजनेअंतर्गत पात्र महिलांना प्रतिमहिना ३ हजार रुपये, महिलांना मोफत बस सेवा, तीन लाखापर्यंत कृषीकर्ज माफी, बेरोजगारांना नोकरी शोधण्यासाठी दरमहा ४ हजार रुपये भत्ता, २५ लाखांचा आरोग्य विमा अशी आश्वासनं आहेत.

महाराष्ट्रासह देश आणि, जगासाठी मुंबई हे एक अर्थ, रोजगार, निर्मिती, गुंतवणूक अशा सर्व घटकांच्या दृष्टीने महत्त्वाचं शहर आहे. मुंबईसह महाराष्ट्र हा सामाजिकदृष्ट्याही प्रगत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातली निवडणूक ही देशासाठी महत्त्वाची निवडणूक आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास इथे एक चांगलं प्रशासन येऊ शकेल. हा जाहीरनामा महाराष्ट्राचा अभ्यास करूनच

प्रकाशित करत आहोत, असं खर्गे म्हणाले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, खासदार संजय राऊत हेही उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आजही ठिकठिकाणी प्रचारसभा होत आहेत. जुन्नर विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यशील शेरकर यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांची प्रचारसभा आज झाली. धाराशिव जिल्ह्यातल्या भूम परंडा विधानसभा मतदारसंघातले मविआचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज सोलापूर इथं सभा होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज गडचिरोली आणि चंद्रपूर  जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र होत आहेत. निवडणूक आयोग आणि केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे जनजागृती करणारी वाहनं राज्यातल्या १५ जिल्ह्यांमधे पाठवणयात आली आहेत. ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था संघटनांमार्फत मॅरेथॉन, प्रदर्शन, कार्यशाळा असे कार्यक्रम होत आहेत.  विधानसभा

निवडणुकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेते राजन भिसे यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट -राजन भिसे (२६ सेकंद)**

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी प्रचार शिगेला पोहोचला आहे. एनडीए आणि इंडिया या दोन्ही आघाड्यांचे नेते आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या बाजूने मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यभर झंझावाती दौरे करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज बोकारो इथं सभा घेत असून गढवा इथंही त्यांची प्रचारसभा होणार आहे, तर रांची मधे ते रोड शो करणार आहेत. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आज भवनाथपूर, तमार आणि खिजरी इथं सभा घेणार आहेत, तर राजदचे ज्येष्ठ नेते तेजस्वी यादव चतरा मधे हंटरगंज इथं प्रचारसभेला संबोधित करणार आहेत.

झारखंडमधे पहिल्या टप्प्यासाठी येत्या १३ नोव्हेंबरला मतदान होणार असून त्याकरता प्रचाराची मुदत उद्या संध्याकाळी संपेल.

**<><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामात शुक्रवारपर्यंतच्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारनं, १२० लाख मेट्रीक टन भाताची खरेदी केली आहे. त्यामुळे पंजाबमधे साडेसहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा २७ हजार ९९५ कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, अ श्रेणीच्या धानासाठी निर्धारीत २३२० रुपये प्रति क्विंटल दरानं किमान आधारभूत किंमतीनं खरेदी केली जात आहे. केंद्र सरकारनं येत्या महिनाअखेरीपर्यंत यंदाच्या खरीप हंगामात १८५ लाख मेट्रीक टन भातखरेदीचं उद्दिष्ट निश्चित केलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ सारंगीवादक पंडित रामनारायण यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार करण्यात आले. मुंबईत शुक्रवारी रात्री त्यांच वांद्रे इथल्या त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९७ वर्षांचे होते. सारंगीला हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात एकल वाद्य म्हणून नावारुपाला आणण्यात त्यांचा मोठा वाटा होता. वयाच्या १० व्या वर्षापासून सारंगीची तालीम घेणाऱ्या रामनारायण यांनी ऑल इंडिया रेडिओच्या लाहोर केंद्रावर सारंगीवादक म्हणून कारकिर्दीला प्रारंभ केला. शास्त्रीय संगीताबरोबरच चित्रपटसंगीतात अनेक गीतांमधे साथ करत त्यांनी आपला ठसा उमटवला. कहीं पे निगाहें कहीं पे निशाना, आंखो ही आँखोमे इशारा हो गया अशा वेगवेगळ्या गीतांमधे त्यांनी सारंगीवर वाजवलेली धून अविस्मरणीय ठरली. देशोदेशी त्यांनी सारंगीचे अनेक कार्यक्रम केले. तसंच अनेक दिग्गज कलाकारांना साथ संगत केली. २००५ मधे त्यांना पद्मविभूषण सन्मान प्रदान करण्यात आला होता. याखेरीज अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळाले होते. प्रख्यात सरोदवादक पंडित बृजनारायण यांचे ते वडील होते, तर प्रसिद्ध सारंगीवादक हर्ष नारायण यांचे आजोबा होते. पंडित रामनारायण यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**<><><><><>**

प्रख्यात भारतीय संगीतकार रिकी केज आणि अनुष्का शंकर यांनी ६७ व्या ग्रॅमी पुरस्कारांसाठी ग्रॅमी नामांकनं मिळवली आहेत. तीन वेळा ग्रॅमी विजेत्या रिकी केजला त्याचा अल्बम ब्रेक ऑफ डॉनसाठी सर्वोत्कृष्ट न्यू एज, ॲम्बियंट किंवा चँट अल्बम श्रेणीतील चौथे ग्रॅमी नामांकन मिळाले. प्रसिद्ध सतारवादक आणि संगीतकार अनुष्का शंकर हिलाही याच श्रेणीत नामांकन मिळाले आहे.

**<><><><><>**

केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल यांनी आज नवीदिल्लीत विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. तसंच ‘इव्ही ॲज अ सर्व्हिस’ अर्थात, ‘विजेवरच्या वाहनांची सेवा’ या कार्यक्रमाची सुरुवातही त्यांनी केली. या कार्यक्रमाची राजधानी दिल्लीसारख्या प्रदूषण वाढलेल्या शहरांकरता गरज असल्याचं ते म्हणाले. औद्योगिक प्रक्रिया, बांधकाम आणि वाहनांच्या वाहतुकीसारख्या बाबींमुळे प्रदूषण वाढत असल्याचं ते म्हणाले. या प्रत्येक क्षेत्रानं प्रदूषण नियंत्रित ठेवण्याकरता प्रयत्न करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

<><><><><>

भारताच्या पंकज अडवाणीनं IBSF विश्व बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेत 150-अप फॉरमॅटचं विजेतेपद पटकावलं आहे. कतारमधे दोहा इथं झालेल्या अंतिम लढतीत त्यानं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा ४ विरुद्ध २ अशा गुणफरकाने पराभव केला. आयबीएफएसच्या जागतिक बिलियर्डस् स्पर्धेतलं पंकज अडवाणी याचं हे २८ वं विजेतेपद आहे. या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारी यानं कांस्यपदक मिळवलं.

//<><><><><>//